मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.in » पुणे, पिंपरी-चिंचवड » शुक्रवार, दिनांक १३ ऑक्टोबर २०२३। पान १

# पालिकेच्या वर्धापन दिनानिमित्त स्पर्धांचा बक्षीस वितरण व उत्कृष्ट कर्मचारी सन्मान सोहळा संपन्न

## अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी स्पर्धेत सहभाग घेवुन मनसोक्त आनंद घेतला

**पिंपरी-चिंचवड।**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**



पिंपरी– पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ४१ व्या वर्धापनदिनानिमित कर्मचारी आणि अधिकारी यांच्यासाठी विविध क्रीडास्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धांचे बक्षीस वितरण आणि सन २०२२ मध्ये उत्कृष्ट कर्मचारी म्हणून सेवा बजावणाऱ्या कर्मचा-यांचा सन्मान सोहळा चिंचवड येथील प्रा.रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहामध्ये आयोजित करण्यात आला होता यावेळी आयुक्त शेखर सिंह यांच्यासह महापालिकेचे अधिकारी, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमादरम्यान २०२२ या वर्षात उत्कृष्ट काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचा आयुक्तांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. त्यामध्ये डॉ. अभिजीत सांगडे, सुनिल दांगडे, अनिता केदारी, मेघा सुर्वे, संदिप वडके, मुकेश कोळप, विजयसिंह भोसले, तन्मय भोसले, विशाल भालेराव, निखील फेंडर, काळुराम कुदळे, रोहिदास गेंगजे, विशाल गायकवाड, मंगेश डोळस, प्रतिक भसारकर, सुमन वंजारे, संजय निकम, अमोल चिपळुणकर, जालिंदर साखरे, संगिता वाळुंजकर, रविंद्र कांबळे, गणेश पौनिकर, सोमनाथ कुदळे, प्रकाश घोडके, किशोर निकाळजे, शिधाजी जाधव, सुनिल बेळगावकर, अंबादास फटांगरे, वनिता बहुले, भागवत देरेकर, वर्षा जानराव, संतोष कदम, राजू काळभोर, नंदिनी कदम, विक्रम कोकणे, युवराज बराटे, मिलिंद पेटकर, शिवकुमार ग्वालवंशी, नवनाथ देवकाते, पुजा लाखे, विवेक मालशे, मिठू बोरूडे, दिपक पवार, सागर बाणेकर, प्रशांत जोशी, दिनेश कुदळे, प्रसाद वाबळे, गोविंद डाके, महेंद्र गायकवाड, हेमा शिंदे, प्रकाश जाधव, प्रिती देवकर या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचा समावेश होता.

वर्धापन दिनानिमित्त महापालिकेच्या वतीने विविध कार्यक्रम तसेच स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. महापालिकेच्या अधिकारी आणि कर्मचारी यांनी या स्पर्धांमध्ये सहभाग घेऊन मनसोक्त आनंद घेतला. क्रीडा स्पर्धांमध्ये बुद्धिबळ स्पर्धा, बॅडमिंटन स्पर्धा, रायफल शुटींग (नेमबाजी), क्रिकेट, कॅरम, रस्सीखेच, संगीत खुर्ची या स्पर्धांचा समावेश होता. तर मैदानी स्पर्धांमध्ये थाळीफेक, गोळाफेक, ५० मीटर, १०० मीटर, २०० मीटर धावणे आणि लांबउडी या स्पर्धांचा समावेश होता. क्रिकेट खेळामध्ये महापालिका पुरूष कर्मचारी महासंघाने तर महिला कर्मचारी महासंघाने प्रथम क्रमांक पटकाविल्याबद्दल आयुक्तांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. रायफल शुटींगमध्ये प्रथम दत्ता सुर्यवंशी, द्वितीय मंगेश देशमुख, तृतीय संदीप विनोद तर महिलांमध्ये क्रमांक प्रथम रुपाली निकम, द्वितीय अस्मिता गुरव, तृतीय माधुरी चव्हाण यांनी पटकाविला.

बॅडमिंटनमध्ये ४० वर्षांखालील महिला एकेरी स्पर्धेत प्रथम क्रमांक मनिषा खेडकर, द्वितीय क्रमांक स्वाती निमगुळकर, तृतीय क्रमांक स्वप्नाली काळभोर तर ४० वर्षांवरील महिला एकेरी स्पर्धेत प्रथम क्रमांक सुनिता पालवे, द्वितीय क्रमांक ऐश्वर्या साठे, तृतीय क्रमांक रोजमेरी जेकब यांनी पटकाविला. ४० वर्षांवरील महिला दुहेरी बॅडमिंटन स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक सुनिता पालवे आणि ऐश्वर्या साठे, तृतीय क्रमांक कांचन कोपरडे आणि रोजमेरी जेकब, तृतीय क्रमांक मंगल जाधव आणि सुषमा तुरूकमारे तसेच ४० वर्षांखालील महिला दुहेरी बॅडमिंटन स्पर्धेत प्रथम क्रमांक मनिषा खेडकर आणि शितल फुले, द्वितीय क्रमांक स्वप्नाली काळभोर आणि स्वाती निमगुळकर, तृतीय क्रमांक मीना पालकर आणि निकीता पठारे यांनी पटकाविला. ४० वर्षांवरील पुरूष बॅडमिंटन स्पर्धेत प्रथम क्रमांक विजयसिंह भोसले, द्वितीय क्रमांक हनुमंत टिळेकर, तृतीय क्रमांक प्रशांत जगताप तसेच ४० वर्षांवरील पुरूष दुहेरी स्पर्धेत प्रथम क्रमांक विजयसिंह भोसले आणि हरविंदरसिंग बंसल, द्वितीय क्रमांक हनुमंत टिळेकर आणि प्रशांत जगताप, तृतीय क्रमांक राजकुमार तिकोणे आणि अरूण वाबळे यांनी पटकाविला.

# वायसीएममधील कर्मचाऱ्यांना दीपावली पूर्वी बोनस देण्याची मागणी

## राष्ट्रीय श्रमिक आघाडीचे अध्यक्ष यशवंत भोसले यांची आयुक्तांकडे मागणी

**चऱ्होली**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**

महापालिकेच्या यशवंत मेमोरियल हॉस्पिटलमध्ये गेली ५ ते १५ वर्षापासून नर्सेस मानधनावर सलग सेवेत कार्यरत असून त्यांच्यासह पालिकेतील सुमारे ५००० कंत्राटी कर्मचाऱ्यांना बोनस कायद्यानुसार बोनस लागू होत आहे. त्यांना दीपावली पूर्वी बोनस द्यावा अशी लेखी मागणी राष्ट्रीय श्रमिक आघाडीचे अध्यक्ष यशवंत भोसले यांनी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त शेखर सिंह यांच्याकडे



केली आहे. यावेळी बोनस कायद्यानुसार या कर्मचाऱ्यांना बोनस देण्याबाबत विचार केला जाईल असे सकारात्मक उत्तर आयुक्त शेखर सिंह यांनी दिले आल्याचे भोसले म्हणाले. ही मागणी मान्य झाल्यास पालिकेत कर्तव्य बजावत असलेल्या मानधनावरील व कंत्राटी सुमारे ५००० कर्मच्या-यांची दीपावली आनंदात जाणार साजरी होणार असून आयुक्त शेखर सिंह हे कर्मचारी व शहरातील (झळाअिंळ ) नागरिकांचे प्रश्नांबाबत संवेदनशील असल्याचे सांगत त्यांचे आभार देखील व्यक्त केले आहेत.

सर्व नर्सेस या राष्ट्रीय श्रमिक आघाडी संघटनेचे सभासद असून त्यांना बोनस कायद्यानुसार दीपावली पूर्वी महापालिकेच्या कायम कर्मचाऱ्याप्रमाणे दिल्या जाणाऱ्या बोनसची रक्कम स्वानुग्रह अनुदान समान काम समान वेतन या कायद्यानुसार देण्यात यावे. अशी मागणी यावेळी भोसली यांनी केली.

# हिंदू संस्कृती संपवण्याची भाषा करणाऱ्यांचा बदला घ्या!

## क्रिकेटप्रेमींची गैरसोय होऊ नये यासाठी पीएमपीएमएल तर्फे विशेष बस

**भोसरी। न्यूज एक्सप्रेस मराठी।** देशाच्या सीमा सुरक्षित करणारे सरकार पुन्हा एकदा २०२४ मध्ये स्थापन झाले पाहिजे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ''महिला आरक्षण' कायदा केला. त्यामुळे लोकसभेच्या संसदेत १९१ महिला खासदार होणार आहेत. महाराष्ट्रातील विधानसभा सभागृहात १०० महिला आमदार होणार आहेत. त्यामुळे देशातील १४० कोटी लोकांना मोदीच पुन्हा प्रधानमंत्री हवे आहेत. अयोध्येत प्रभू श्रीरामचंद्रांचे राम मंदिर साकारात आहे. पण, मोदींना हारवण्यासाठी मुंबईत २८ पार्टी एकत्र आल्या. त्यातील एका पार्टीचा मुख्यमंत्री स्टॅलीनचा मुलगा उदयनिधी म्हणतो 'या देशातील हिंदू संस्कृती संपवून टाकू'. याचा बदला देशातील जनता घेतल्याशिवाय रहाणार नाही. आत्मनिर्भर भारत करायचा असेल, तर मोदींना साथ द्या, असे आवाहन भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले.



### बावनकुळे म्हणतात ''एकच वादा.. महेशदादा''

» शिरुर लोकसभा मतदार संघात लोकसभा प्रवास योजना आणि घर चलो अभियान सक्षमपणे राबवल्याबाबत प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी निवडणूक प्रमुख महेश लांडगे यांचा जाहीर सभेमध्ये ''एकच वादामहेशदादा'' असा उल्लेख करीत कौतुकाची थाप दिली. विशेष म्हणजे, येत्या २२ जानेवारी २०२४ रोजी अयोध्येत प्रभू श्रीराम मंदिराचे दर्शन घेण्यासाठी कोण जाणार? असा उपस्थित नागरिकांनी ''एकच वादा..महेशदादा..'' असा नारा दिला. त्यावर महेश लांडगेंकडे नोंदणी करुन टाका, असे आवाहन करीत बावनकुळे यांनी आमदार लांडगे यांना किती लोकांना अयोध्येला घेवून जाणार असे विचारले. त्यावर पिंपरी-चिंचवडमधून ५ हजार नागरिकांना प्रभूश्रीराम मंदिराचे दर्शनासाठी घेवून जाणार असे सांगितले. यावर बावनकुळे यांनी आमदार लांडगे यांचे अभिनंदन केले.

भाजपातर्फे शिरुर लोकसभा मतदार संघांतर्गत 'घर चलो अभियान' आणि भाजपा वॉरिअर्स संवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यानिमित्त' भव्य रॅलीचे आयोजन धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज चौक, ममता स्विट शेजारी, दत्तनगर- दिघी येथे करण्यात आले. या रॅलीला सामान्य नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

यावेळी राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, प्रदेश उपाध्यक्ष राजेश पांडे, माजी मंत्री बाळा भेगडे, भाजपा प्रदेश सरचिटणीस मुरलीधर मोहोळ, विक्रांत पाटील, ओबीसी मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष योगेश टिळेकर, निवडणूक प्रमुख महेश लांडगे, पिंपरी-चिंचवड शहराध्यक्ष शंकर जगताप, भोसरी विधानसभा निवडणूक प्रमुख विकास डोळस, संयोजक विजय फुगे, पुणे भाजपाचे शहराध्यक्ष धीरज घाटे यांच्यासह पिंपरी-चिंचवडमधील पदाधिकारी, मा. नगरसेवक, मंडलप्रमुख उपस्थित होते. छत्रपती शिवाजी महाराज, धर्मवीर संभाजी महाराज यांच्यासह 'भारत माता की जय' अशा जयघोषांनी दिघी परिसर दणाणून सोडला. ढोल-ताशांच्या गजरात भाजपाने शक्तीप्रदर्शन केले. प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, आगामी २०२४ मधील मे किंवा जून महिन्यात होणाऱ्या लोकसभा निवडणुकीत देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी तिसऱ्यांदा पंतप्रधान होतील. ''कश्मिरच्या लाल चौकात मोदींनी तिरंगा फडकावला म्हणून माझं मत मोदींना आहे..' सुमारे १ हजार १३ लोकांना आम्ही भेटलो. त्यापैकी १ हजार १२ लोकांनी मोदीच पुन्हा पंतप्रधान व्हावेत, असे म्हणतात. त्यामुळे शिरुर लोकसभा मतदार संघातील ९० टक्के लोक मोदींना मतदान करतील. या मतदार संघाचा खासदार महाराष्ट्रात सर्वांत जास्त मतांनी निवडून येईल. तो खासदार पंतप्रधान म्हणून मोदींना मतदान करेल, असा 'वादा' करा, असे आवाहन बावनकुळे यांनी केले. दरम्यान, 'मेरी माटी मेरा देश' या अभिमानातून दिल्लीत अमृत वाटिका तयार करण्यात येणार आहे.

> **“** कोविड काळात संपूर्ण जग हादरले. पण, संपूर्ण देशाला मोफत लस देण्याची भूमिका घेतली. जगभरात लस पुरवठा केला. जगातील १४ देशांनी मोदींना त्यांच्या देशाचा सर्वोच्च पुरस्कार दिला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सर्वोत्कृष्ठ काम केले. त्यांच्या पाठित खंजीर खुपसला. उद्धव ठाकरे, शरद पवार यांनी फडणवीस यांना थांबवले. पण, इथले इथेच फेडावे लागले. आज त्यांची परिस्थिती काय आहे? ही महाराष्ट्राची जनता पाहते आहे. मुख्यमंत्रीपद गेले, पार्टी गेली, असेच हाल शरद पवारांचे आहेत. साडेतीन जिल्ह्याचे प्रधानमंत्री बनले होते.
>
> **– चंद्रशेखर बावनकुळे,**
> **प्रदेशाध्यक्ष भाजपा.**

# भाजपतर्फे मनपा आकुर्डी हॉस्पीटल येथे आंतरराष्ट्रीय बालिका दिन

## बालिका यांना कपडे आणि त्यांच्या माता यांना साड्या भेट देवून शुभेच्छा

**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्सप्रेस मराठी।** जागतिक बालिका दिनानिमित्त (११ ऑक्टोबर) भाजपा बेटी बचाव बेटी पढाओ आघाडीच्या जिल्हा संयोजक प्रिती कामतीकर यांच्यावतीने मनपाच्या आकुर्डी हॉस्पिटल येथे नुकत्याच जन्मलेल्या पाच बालिका आणि माता यांचे विधिवत पुजन करून जागतिक बालिका दिन साजरा करण्यात आला. प्रसंगी, बालिका यांना कपडे आणि त्यांच्या माता यांना साड्या भेट म्हणून देवून शुभेच्छा देण्यात आल्या.



तसेच, लाडू भरवून कन्या आगमनाचे स्वागत करण्यात आले. भाजपा शहराध्यक्ष शंकर जगपात यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आलेल्या या कार्यक्रमासाठी भाजपा प्रवक्ते तथा वरिष्ठ उपाध्यक्ष राजू दुर्गे, आकुर्डी हॉस्पिटलचे प्रमुख डॉ. बाळासाहेब होडगर, पुनम फके, कांचन डाफने, पल्लवी मारकड, लक्ष्मण टकले, यांच्यासह भाजपा महिला पदाधिकारी तसेच अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

प्रिती कामतीकर म्हणाल्या, देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या बेटी बचाव बेटी पढाओ या आवाहनाला सर्व समाज बांधवांनी साथ देणे आवश्यक आहे. मुलगा – मुलगी समान मानून मुलींच्या जन्माचा आनंदोत्सव साजरा केला पाहिजे. घटत्या बाल लिंग गुणोत्तराची ही प्रवृत्ती मागे टाकण्यासाठी आणि याचे महत्त्व अधोरेखित करण्यासाठी महिला आणि बाल मंत्रालयाच्या विकास आरोग्य आणि कुटुंब कल्याण विभागाने, महिलांच्या सक्षमीकरणामध्ये शिक्षण मनुष्यबळ विकास मंत्रालयाच्या सहकार्याने बेटी बचाओ-बेटी पढाओ योजना सुरू केली आहे. या योजनेमार्फत मुलींच्या संरक्षणाच्या महत्त्वाविषयी जागरूकता निर्माण करून त्यांच्या शिक्षणावर लक्ष केंद्रित करण्यात येत आहे.

महिला साक्षरता दर पुरुषांपेक्षा कमी आहे. भारतातील अनेक मुलींची लग्ने लहान वयात होतात. बालमजुरी, सामाजिक दबावामुळे त्यांचे प्राथमिक शिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्यांना शाळेपासून दूर केले जाते. मुली अशिक्षित राहिल्याने त्यांना कार्यक्षेत्रात प्रवेश करणे अधिक कठीण होते. परिणामी, त्या कठीण आर्थिक परिस्थितीत सापडतात. यावर मात करण्यासाठी केंद्र शासनाची सुकन्या योजना आणि महाराष्ट्र शासनाने नुकतीच मुलींसाठी लेक लाडकी योजना जाहीर केली आहे. या योजनेअंतर्गत मुलींना मिळणाऱ्या एक लाख रुपयांच्या टप्प्यांची माहिती देखील संयोजिका प्रिती कामतीकर यांनी यावेळी दिली.

# शिरूर लोकसभेसाठी भाजपाचा उमेदवार कोण?

## खासदार अमोल कोल्हे हे पुन्हा निवडणूक लढवणार



**पुणे। न्यूज एक्स्प्रेस मराठी।** शिरूर लोकसभा निवडणुकीमध्ये भाजपाचा उमेदवार कोण असणार याची उत्सुकता सर्वांनाच लागलेली आहे. कारण त्या ठिकाणी राष्ट्रवादी शरद पवार गटाकडून विद्यमान खासदार अमोल कोल्हे हे पुन्हा निवडणूक लढवणार असण्याची शक्यता आहे. शिरूर लोकसभा मतदार संघात भाजपाचा उमेदवार हा महेश लांडगे असावा अशी कार्यकर्त्यांची इच्छा आहे.

महेश लांडगे हे अत्यंत कष्टाळू आणि उत्कृष्ट नेते आहेत. असं कौतुक प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी केल आहे. परंतु, महेश लांडगे हे शिरूर लोकसभा लढवणार की नाही. यावर बोलताना आमचं केंद्रीय नेतृत्व आणि राज्यातील महायुतीचे प्रमुख नेते उमेदवार ठरवणार असल्याचं त्यांनी म्हटलं आहे. त्यामुळे आमदार महेश लांडगे यांना शिरूर लोकसभेसाठी सध्यातरी वेट अँड वॉच ची भूमिका घ्यावी लागणार आहे. चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, शिरूर लोकसभेचा खासदार सर्वात जास्त मतांनी निवडून येईल तसा प्रतिसाद शिरूर लोकसभा मतदारसंघात मिळत आहे. महा विजयाचा ४५ चा आकडा आम्ही पूर्ण करू असा विश्वास बावनकुळे यांनी व्यक्त केला आहे. यावेळी अमोल कोल्हे यांनी केलेल्या टीकेला प्रत्युत्तर देताना बावनकुळे म्हणाले, आमच्यावर टीका करणाऱ्यांनी जनतेला खऱ्या अर्थाने फसवला आहे.

माझ्यावर अमोल कोल्हे यांनी टीका केली आहे, त्यांना ती टीका लखलाभ. पुढे ते म्हणाले, मराठा बांधवांनी मला काळे झेंडे दाखवले. देवेंद्र फडणवीस हे मुख्यमंत्री असताना मराठा समाजाला संपूर्ण आरक्षण दिल गेलं.

मराठा आरक्षणाचे खरे शिल्पकार हे देवेंद्र फडणवीस आणि चंद्रकांत पाटील आहेत. जे आरक्षण कॅबिनेटने दिले, जे आरक्षण विधिमंडळात मंजूर झालं, सुप्रीम कोर्टात देखील टिकलं ते देवेंद्र फडणवीस यांच्यामुळे. ज्यांनी हे आरक्षण घालवलं त्यांनाच प्रश्न विचारले पाहिजेत. मला जे काळे झेंडे दाखवून काय फायदा?, मराठा समाजाच्या आरक्षणाला भाजपाच संपूर्ण समर्थन आहे. आम्ही त्यांच्या पाठीशी आहोत. त्यामुळे काळे झेंडे दाखवून मराठा आरक्षणाचा प्रश्न सुटणार नाही. असेही त्यांनी म्हटलं आहे.

### महेश लांडगे यांना वेट अँड वॉचची भूमिका

» महेश लांडगे हे शिरूर लोकसभा लढवणार की नाही. यावर बोलताना आमचं केंद्रीय नेतृत्व आणि राज्यातील महायुतीचे प्रमुख नेते उमेदवार ठरवणार असल्याचं त्यांनी म्हटलं आहे. त्यामुळे आमदार महेश लांडगे यांना शिरूर लोकसभेसाठी सध्यातरी वेट अँड वॉचची भूमिका घ्यावी लागणार आहे. चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, शिरूर लोकसभेचा खासदार सर्वात जास्त मतांनी निवडून येईल तसा प्रतिसाद शिरूर लोकसभा मतदारसंघात मिळत आहे. अमोल कोल्हे यांनी केलेल्या टीकेला प्रत्युत्तर देताना बावनकुळे म्हणाले, आमच्यावर टीका करणाऱ्यांनी जनतेला खऱ्या अर्थाने फसवला आहे.

# बालेवाडी शॉपिंग ॲण्डफूड फेस्टिवलमध्ये 'बॉईज ४' चित्रपटाच्या कलाकारांची धम्माल!

## ललित पाटील प्रकरणावरुन न्यायाधीशांनी पुणे पोलिसांना झापले




**पुणे। न्यूज एक्स्प्रेस मराठी।** लहू बालवडकर सोशल वेलफेअर तर्फे आयोजित दोन दिवसांच्या बालेवाडी शॉपिंग ॲण्ड फूड फेस्टिव्हलची उत्साहात सांगता झाली. यादरम्यान पहिल्या दिवशी बॉईज ४ या मराठी चित्रपटाच्या कलाकारांनी फेस्टिवलला भेट देत सर्वांचाच उत्साह वाढवला. बालेवाडीमधील दसरा चौकातील आठवडे बाजार मैदानावर या शॉपिंग ॲण्ड फूड फेस्टिव्हलचे आयोजन ७ आणि ८ ऑक्टोबर दरम्यान सकाळी अकरा ते रात्री नऊ पर्यंत केले होते. या शॉपिंग ॲण्ड फूड फेस्टिव्हलला बाणेर बालेवाडीकरांनी भरभरून प्रतिसाद दिला. शॉपिंग ॲण्ड फूड फेस्टिवलमध्ये तब्बल ६० हुन अधिक गृहपयोगी तसेच शॉपिंगच्या उत्पादनांचे स्टॉल्स या ठिकाणी उपलब्ध होते. उत्कृष्ट नियोजन असणाऱ्या या फेस्टिव्हलला बाणेर बालेवाडी परिसरातील नागरिकांनी उत्स्फूर्तपणे प्रतिसाद देत जोरदार खरेदी केली. या फेस्टिव्हलचे विशेष आकर्षण ठरले ते म्हणजे बॉईज ४ या मराठी चित्रपटाच्या सर्वच कलाकारांनी फेस्टिवलला दिलेली भेट. या वेळी सिनेमाच्या सर्व टीमने बाणेर बालेवाडीकरांसोबत संवाद साधत धमाल केली. या मध्ये पार्थ भालेराव, अभिनय बेर्डे, प्रतीक लाड, रसिक शोत्री, रितूजा शिंदे, जुई बेंडखळे सह दिग्दर्शक विशाल देवरुखकर, आणि निर्माता राजेंद्र शिंदे आदी उपस्थित होते. या वेळी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ओंकार दीक्षित यांनी केले.

या वेळी 'बॉईज ४' बद्दल दिग्दर्शक विशाल देवरुखकर म्हणाले की, ''आतापर्यंत 'बॉईज'च्या तिन्ही भागांवर प्रेक्षकांनी भरभरून प्रेम केले. या तिन्ही भागांमध्ये काहीतरी सरप्राईस होते. 'बॉईज ४' मध्येही असेच सरप्राईस आहे. प्रेक्षकांचे मिळणारे प्रेम पाहूनच आम्हाला 'बॉईज ४' करण्याची प्रेरणा मिळाली.

### आत्मनिर्भर होण्यासाठी मदत!

» या ''शॉपिंग ॲण्ड फूड फेस्टिव्हल''च्या माध्यमातून वेगवेगळ्या क्षेत्रातील स्वतःचा व्यवसाय सुरु करणाऱ्या महिला आणि व्यावसायिकांना एकत्र करत लहू बालवडकर सोशल वेल्फेअर हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून देत आहे. छोट्या-मोठ्या व्यावसायिकांना या शॉपिंग ॲण्ड फूड फेस्टिव्हलचा मोठा उपयोग होत असून त्यांना आत्मनिर्भर होण्यासाठी देखील मदत होत आहे. स्थानिक पातळीवरील उद्योगाला प्रोत्साहन देऊन त्यांना हातभार लावण्याचे काम लहू बालवडकर सोशल वेल्फेअर करत आहे.

# शिक्षण हक्क कायद्यांतर्गत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसोबत भेदभाव!

## पुणे, मुंबईतील अनेक शाळांची आरटीई संकेतस्थळावर नोंद नाही

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** पुणे, मुंबई सारख्या शिक्षणाचे केंद्र असलेल्या महानगरांमध्ये शिक्षण हक्क कायद्यांतर्गत (आरटीई) प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसोबत भेदभाव होत असल्याचे निदर्शनास आले आहे. या संदर्भात शिक्षण विभागाच्या सर्व उपसंचालकांसोबत पुढील आठवड्यात बैठक घेण्यात येणार असून शिक्षणमंत्र्यांकडे आरटीई कायद्याच्या परिपूर्ण अंमलबजावणीसाठी शिफारशी करण्यात येणार आहे, अशी माहिती राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाच्या अध्यक्ष अॅड. सुशीबेन शहा यांनी बुधवारी सांगितले. आयोगाद्वारे पुण्यातील महात्मा गांधी प्रशिक्षण केंद्र, महिला व बाल विकास कार्यालय येथे आयोगाच्या सदस्यांसोबत पुणे विभागाच्या प्रलंबित प्रकरणांची दोन दिवस सुनावणी घेण्यात आली. या दोन दिवसांत ५० सुनावण्या घेण्यात आल्या. त्यानंतर पत्रकारांशी बोलताना शहा म्हणाल्या, की शिक्षणाचे प्रमुख केंद्र असलेल्या पुणे, मुंबईतील अनेक शाळांची आरटीई संकेतस्थळावर नोंद नाही. पुण्यातील अनेक शाळांमध्ये आरटीई अंतर्गत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना भेदभावाचा सामना करावा लागत आहे. शाळांच्या वेळा, सहल, पुस्तके, प्रयोगशाळा, क्रीडा शुल्काबाबत भेदभाव केला जात असल्याच्या तक्रारी आयोगाकडे आल्या आहेत. या कायद्याच्या अंमलबजावणीबाबत विद्यार्थी, पालक, शाळांमध्ये नाराजी आहे. शिक्षण हा समवर्ती सूचीतील विषय असल्याने या कायद्याच्या काटेकोर अंमलबजावणीसाठी आयोगाने पुढाकार घेतला आहे. या संदर्भात सर्व शिक्षण उपसंचालकांची बैठक घेणार असून नोव्हेंबरमध्ये शिक्षणमंत्र्यांना कायद्याच्या अंमलबजावणीसाठी शिफारस केली जाईल.या सुनावणीत विशेषतः पुणे, पिंपरी विभागातील शालेय शुल्क वाढ, बाल लैंगिक अत्याचार, पोक्सो अंतर्गत दाखल गुन्हे आदींबाबत सुनावणी घेण्यात आली. शहा यांनी महिला व बाल विकास विभागाचे आयुक्त प्रशांत नारनवरे यांची भेट घेऊन बाल सुधारगृहातील पायाभूत सुविधांची कमतरता, सुरक्षा याबाबत चर्चा केली. पुण्यातील एका शाळेत झालेल्या रॅगिंग प्रकरणी बाल हक्क संरक्षण आयोग सर्वोतोपरी प्रयत्न करेल, असे शहा यांनी संबंधित पालक प्रतिनिधींना सांगितले. या सुनावणीला महाराष्ट्र राज्य बाल हक्क आयोगाचे सदस्य चैतन्य पुरंदरे, जयश्री पालवे, सायली पालखेडकर, संजय पेंगर, प्रज्ञा खोसरे आदी उपस्थित होते.




### आयोगासाठी अत्यल्प तरतूद

» महाराष्ट्र राज्य बाल हक्क आयोगासाठी यंदा अवघी १३ लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. ही थट्टा असून या अत्यल्प तरतुदीत आयोगाचे कामकाज कसे चालविणार, असा उद्वेग अध्यक्ष शहा यांनी व्यक्त केला. आयोगासाठी दोन कोटी रुपये निधीची तरतूद करण्याची मागणी सरकारकडे केल्याचेही त्यांनी या वेळी सांगितले.

# 'ससून'च्या अधिष्ठात्यांच्या अडचणीत वाढ!

## ललित पाटील प्रकरण : रुग्णालयाचे व्यवस्थापन संशयाच्या भोवऱ्यात

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** अमली पदार्थ तस्करी प्रकरणाचा सूत्रधार ललित पाटील याने ससून रुग्णालयातून पलायन केल्याने रुग्णालयाचे व्यवस्थापन संशयाच्या भोवऱ्यात सापडले आहे. कैदी रुग्णांना ससूनमध्ये विशेष वागणूक दिल्याचा आरोप होत आहे. यातच आता काँग्रेसचे आमदार रवींद्र धंगेकर यांनी ललित पाटील प्रकरणात ससूनच्या अधिष्ठात्यांवर गुन्हा दाखल करण्याची मागणी पोलीस आयुक्तांकडे केली आहे. ललित पाटील हा ससून रुग्णालयातील कक्ष क्रमांक १६ मध्ये उपचार घेत होता. मागील काही महिन्यांपासून त्याच्यावर उपचार सुरू होते. ससून रुग्णालयात बसून तो अमली पदार्थ तस्करी करीत होता. ससून रुग्णालयाच्या प्रवेशद्वारावरच सव्वादोन कोटींचे अमली पदार्थ जप्त करण्यात आले होते. त्यानंतर या संपूर्ण प्रकरणाचा उलगडा झाला. मात्र, नंतर लगेचच ससूनमधून ललित पाटीलने पलायन केले होते. या प्रकरणी पोलिसांसोबतच ससूनच्या व्यवस्थापनाकडे बोट दाखविले जात आहे. या प्रकरणी ससून व्यवस्थापनाने त्रिसदस्यीय समिती नेमली आहे. या समितीने नेमकी चौकशी करून काय अहवाल दिला, याबद्दल ससून व्यवस्थापनाकडून गोपनीयता बाळगली जात आहे. दरम्यान, आमदार धंगेकर यांनी मंगळवारी ससून रुग्णालयाला भेट देऊन पाहणी केली होती. त्यानंतर धंगेकर यांनी बुधवारी थेट पोलीस आयुक्तांकडे या प्रकरणी गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे. धंगेकर यांनी म्हटले आहे की, अमली पदार्थ तस्करी प्रकरणातील आरोपी ललित पाटील हा ससून रुग्णालयात अनेक महिने उपचार घेत होता. त्याच ठिकाणाहून तो तस्करी करीत असल्याचे उघडकीस आले आहे. ललित पाटील याच्यावर उपचार करणारे ६ डॉक्टर वेगवेगळ्या आजारांचे कारण पुढे करून त्याचा ससूनमधील मुक्काम वाढविण्याचा प्रयत्न करीत होते. गुन्हेगारास गुन्ह्यासाठी मदत करणे व त्याला मदत पोहचविणे हा एक प्रकारचा गुन्ह्याचाच भाग आहे.



**"अमली पदार्थांच्या माध्यमातून तरुण पिढीला बरबाद करणाऱ्या ललित पाटीलला मदत करणारे डॉक्टरही या प्रकरणात तेवढेच दोषी आहेत. त्यामुळे त्याच्यावर उपचार करणाऱ्या ६ डॉक्टरांसह ससूनच्या अधिष्ठात्यांना सहआरोपी करून पोलिसांनी गुन्हा दाखल करावा.**

**-आमदार रवींद्र धंगेकर, काँग्रेस**